# Goa University

Marathi Discipline, SGSLL.

## वार्षिक शारदोत्सव

'Annual Sharadotsav'

| | |
|---|---|
| **1. Title of the Event** | वार्षिक शारदोत्सव 'Annual Sharadotsav' |
| **2. Date** | 20 October 2023 |
| **3. Mode of conduct** | PHYSICAL |
| **4. School** | Marathi Discipline, SGSLL, Goa University. |
| **5. The objectives** | 'Annual Sharadotsav' was celebrated as a cultural activity by students of Marathi for last so many years. As per NEP, Marathi Program, is having courses like 'लोकसाहित्याचा अभ्यास' (MAR-521), 'लोकसाहित्याचे संशोधन'(MAR-601), 'तौलनिक साहित्याभ्यास' (MAR-602), 'सांस्कृतिक अभ्यास आणि प्रवासवर्णने' (MAR-625), पर्यावरण आणि मराठी साहित्य (MAR-626). Most of the Marathi students are associated with research in folklore as part of their Compulsory Dissertation. Accordingly objectives of 'Annual Sharadotsav' are as follows…<br>1. To create an awareness about the Goan cultural heritage and to encourage students for research in Goan Folklore and Goan traditional arts.<br>2. To make students aware of their ecological and socio-cultural responsibilities.<br>3. To introduce multidimensional folk cultural aspects of Goan culture.<br>4. To explain the correlation between National integration, harmony, culture and literature.<br>5. To facilitated our students through this beneficial cultural activity to research and study various folklores of Goa.<br>6. To enlighten the interaction of folklore, literature, poetry and life and develop social bond amongst students. |
| **6. Special Research base Lecture** | Special Research base Lecture of Dr. Vinay Madgaonkar (Coordinator and Marathi Program Director) on **'पर्यावरण संवर्धन आणि शारदेचे अधिष्ठान'** (Environmental Conservation and Sharada Pujan) was organized. He explained from a scientific point of view how environmental conservation is being done with respect to Bharateey culture and how our ancestors associated Gods and Goddesses with environment.<br>Dr. Vrushali Mandrekar (Vice Dean, Academic, SGSLL) was the Chairperson. She explained the need and importance of cultural ethics. Which are introduced to the students through cultural event like Sharadotsav. |

| | |
|---|---|
| **7. Description of the Program** | Marathi students have been celebrating the Annual Sharadotsav for many years as students benefit from social, literary and cultural enrichment. Student's representative Saili Garde (President of Sharada Mandal) did Sharada Pujan. After Sharada Pujan students across Disciplines and Schools performed 'Fugdi', 'Ghumat Aarti', 'Bhajan' and 'Dindi' as a part of 'Sharadotsav'. It facilitate Student community to get introduced and understand multidimensional folk and cultural aspects in Goa.<br>Dean, Vice Deans, Program Directors with a large number of faculty members, students and administrative staff from various departments participated in these performing cultural activities.<br>Dean SGSLL Prof. Dr. Anuradha Wagle, Vice Deans Dr. Vrushali Mandrekar and Dr. Prakash Parienkar, colleagues from Marathi Discipline Dr. Hemant Aiya, Purva Vasta, Chinmay Ghaisas, and Jayesh Gaonkar provided admirable support. |
| **8. Awarded students for clearing NET Exam** | Marathi students Sneha Desai, Gauri Nadkarni, Rama Barve and Prachi Naik were awarded for clearing the NET exam, by Dr. Vrushali Mandrekar (Vice Dean, Academic, SGSLL) |
| **9. Key outcomes** | 1. The relationship between national unity, harmony, culture and literature was clearly understood.<br>2. 'Annual Sharadotsav' was very enlightening for Japanese students who visited Goa University as part of the 'Study India Programme'.<br>3. Students were introduced to scientific aspects of Bharateey culture.<br>4. The life proclaimed in the Bharateey Puran and the modern life were discussed to help the studants to understand and practice the Life skills and lifestyle then and now in order to experience and live a meaningful life.<br>5. The interaction of folklore, literature and lifestyle was enlightened.<br>6. It is also recognized that the 'Annual Sharadotsav' activity is largely related to the **SDG 4** (Ensure inclusive and equitable quality education and promote lifelong learning opportunities for all.)<br>7. It was helpful and also encouraged students and faculty members for research in area of Goan folklore and culture.<br>8. In terms of facilitating our students, the 'Annual Sharadotsav' proved beneficial in creating an atmosphere of solidarity among the students, faculty members and administrative staff. |

Dr. Vinay Madgaonkar
Coordinator and Director - Marathi Program

Prof. Dr. Anuradha Wagle
Dean, SGSLL

DEAN
Shenoi Goembab School of
Languages & Literature
Goa University

# गोवा विद्यापीठ
## शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा
## मराठी अध्ययनशाखा

सस्नेह निमंत्रण

आयोजित

वार्षिक

# शारदोत्सव २०२३

दिनांक : २० ऑक्टोबर २०२३
स्थळ : मराठी-हिंदी अध्ययनशाखा, ब्लॉक 'बी'
वेळ : सकाळी ९.३० वाजल्यापासून

### कार्यक्रम



०९.३० - दिंडी मिरवणूक
१०.३० - श्री सरस्वती पूजन
११.३० - मंगलारती
१२.०० - **सरस्वती वंदना** - दिव्या बर्वे, कीर्तन मंगलाचरण - सायली गर्दे
१२.१५ - **"पर्यावरण संवर्धन आणि शारदेचे सांस्कृतिक अधिष्ठान"** याविषयावर
**डॉ. विनय मडगांवकर** यांचे मार्गदर्शन.
अध्यक्ष - **डॉ. वृषाली मांद्रेकर** (उप-अधिष्ठाता) शैक्षणिक
१२.३० - नेट/सेट उत्तीर्ण मराठी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि परितोषिक वितरण
०१.०० - **घुमट आरती, सादरकर्ते :** गोवा विद्यापीठ विद्यार्थी घुमट आरती संघ
०२.३० - फुगडी
०३.३० - दिंडी
०४.०० - **शारदोत्सव सांगता**



## स्पर्धा (वेळ : १०.३० ते ११.३०)

- फुलांची वेणी (फाती) तयार करणे
- मराठी पुस्तक मुखपृष्ठ चित्र

(स्पर्धेसाठी संपर्क :– 8411844619)

**आपण सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा ही विनम्र विनंती. धन्यवाद!**

| | | |
|---|---|---|
| **कु. सायली गर्दे** | **डॉ. विनय मडगांवकर** | **प्रो. डॉ. अनुराधा वागळे** |
| अध्यक्ष – शारदा विद्यार्थी मंडळ | संचालक आणि कार्यक्रम संयोजक | अधिष्ठाता |
| मराठी अध्ययनशाखा | मराठी अध्ययनशाखा | शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा |



Shree Sharada Poojan was done by Sailee Garade a student of Marathi discipline In the presence of Marathi Program Director, Dr. Vinay Madgaonkar.



Librarian Dr. Sandesh Desai with Goa University Library Staff



‘Annual Sharadotsav’ was very enlightening for Japanese students who visited Goa University as part of the 'Study India Programme'.



Administrative staff participated in Sharadotsav



Prof. Dr. Anuradha Wagle, Dean SGSLL




Honoring students who have passed NET exam in Marathi subject

# गोवा विद्यापीठात वार्षिक शारदोत्सव उत्साहात



गोवा विद्यापीठाच्या शारदोत्सवात उपस्थित शिक्षकवर्ग व विद्यार्थीवर्ग.

**पणजी प्रतिनिधी** : गोवा विद्यापीठात नुकताच गोवा विद्यापीठ शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा मराठी अध्ययनशाखेतर्फे मराठी हिंदी अध्ययनशाखेच्या ब्लॉक बी. इमारतीत वार्षिक शारदोत्सव उत्साहात साजरा झाला. देवी शारदेच्या मूर्तीची पारंपरिक पद्धतीने दिंडी मिरवणूक काढून प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. मराठी अध्यायनशाखेची द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी सायली गर्दे हिच्याहस्ते देवी शारदेची पुजा अर्चना झाली. गोवा विद्यापीठाच्या वाद्यवृंदाने घुमट आरती सादर केली तर दिव्या बर्वे हिने सरस्वती वंदनेने औपचारिक कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी ''पर्यावरण संवर्धन आणि शारदेचे सांस्कृतिक अधिष्ठान'' ह्या विषयावर प्राध्यापक डॉ. विनय मडगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भारतीय संस्कृती, निसर्ग आणि दैवते, पूजाविधित वापरले जाणारे घटक, वनस्पति आणि आयुर्वेद यांच्यातील संबंध, परंपरा आणि निसर्ग यांच्यातील सह संबंध याविषयी सांगून निसर्गपूरक असलेल्या भारतीय संस्कृतीचे माहात्म्य कथन केले. महाशाळेच्या उपाधिष्ठाता डॉ. वृषाली मांद्रेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केलेल्या रमा बर्वे, गौरी नाडकर्णी, प्राची नाईक, स्नेहा देसाई यांना पारितोषिक प्रदान करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच शारदोत्सवाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या फुलांची वेणी या स्पर्धेसाठी कविता गावडे अन् मराठी पुस्तक मुखपृष्ठ चित्रण स्पर्धेत अव्वल आल्याबद्दल दिप्लवी नाईक हिला प्रथम, वेदांत खांडेपारकर यास द्वितीय तर गजानन गावस याला तृतीय, अशाप्रकारे विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. फुगडीसारख्या लोककलाप्रकारांचे सादरीकरणही झाले. दिंडीच्या गजरात शारदोत्सवाची सांगता झाली. याप्रसंगी मराठी अध्ययन शाखेच्या प्राध्यापक डॉ. सुनीता उम्रस्कर, डॉ हेमंत अय्या, प्रा. चिन्मय घैसास, प्रा. पूर्वा वस्त, प्रा. जयेश गांवकर उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमकार गोवेकर याने केले.




Special Research base Lecture of Dr. Vinay Madgaonkar on 'पर्यावरण संवर्धन आणि शारदेचे अधिष्ठान' (Environmental Conservation and Sharada Pujan)




Cultural Rangoli



After Sharada Pujan students across Disciplines and Schools performed ‘Fugdi’, ‘Ghumat Aarti’, ‘Bhajan’ and ‘Dindi’ as a part of ‘Sharadotsav’.

# गोवा विद्यापीठात यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान

*टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ६ :** भारतीय संस्कृतीनुसार आपल्या देवदेवतांचे सहसंबंध वृक्ष-वनस्पती तसेच पशू-पक्षासी अर्थात निसर्गाशी-पर्यावरणाशी दर्शविले आहेत. महारुद्र शंकर शीतल कैलासात निवास करतात. त्यांचे वाहन नंदी, मस्तकी गंगा, भालचंद्र, गळ्यात रुद्राक्षमाळा, त्याला बेल प्रिय. त्यांची पत्नी भगवती पार्वती तिची वाहन सिंह, पुत्र गणपतीला दुर्वा प्रिय, त्यांचे वाहन उंदीर तर कार्तिकेय षडानन याचे वाहन मोर, हे सर्व काही पर्यावरणपूरक आहे. श्रीमद्भगवतगीतेच्या दहाव्या अध्यायात या पर्यावरणातील विविध घटक आपली विभूती असल्याचे श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. तुलसीपूजा, वटपोर्णिमा, नागपंचमी, श्रीगणेशचतुर्थी, नवरात्रीच्या कालावधीत रुजवणपूजन हे सण-उत्सव पर्यावरणसंवर्धनासाठी प्रेरक ठरत आहेत. संतांनी पर्यावरण आपल्या साहित्यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे तसेच देवी शारदेचे स्तवन केले आहे. रणमाले या लोकनाट्यात तसेच गोमंतकीय फुगडी गीतामधून सरस्वती तथा शारदा स्तवन अभ्यासनीय आहे, असे प्रतिपादन गोवा विद्यापीठातील मराठी अध्ययनशाखेचे संचालक डॉ. विनय मडगावकर यांनी केले. गोवा विद्यापीपीठात शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळे अंतर्गत कार्यरत असलेल्या मराठी अध्ययनशाखे आयोजित केलेल्या वार्षिक शारदोत्सवाचे औचित्य साधून यशस्वी विद्यार्थ्यांच्या सन्मान समारोहात पर्यावरण संवर्धन आणि शारदेचे सांस्कृतिक अधिष्ठान या विषयावर ते बोलत होते.



पणजी : मराठी विषयात नेट सेट परीक्षा उत्तीर्ण माजी विद्यार्थी, वार्षिक शारदोत्सवातील स्पर्धा विजेते विद्यार्थी यांच्यासोबत उपअधिष्ठाता डॉ. वृषाली मांद्रेकर, मराठी अध्ययनशाखेचे संचालक डॉ. विनय मडगांवकर आणि शारदा विद्यार्थी मंडळाचे सदस्य.

व्यासपीठावर अध्यक्षस्थानी डॉ. वृषाली मांद्रेकर, शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळेच्या उप अधिष्ठाता (शैक्षणिक), २०२२-२०२३ या वर्षी मराठी विषयात नेट सेट परीक्षा उत्तीर्ण रमा बर्वे, गौरी नाडकर्णी, प्राची नाईक, स्नेहा देसाई हे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

श्रीदेवी शारदेच्या मूर्तीची पारंपरिक पद्धतीने भव्य दिंडी मिरवणूक काढून मराठी अध्यायनशाखेची विद्यार्थिनी तथा युवा कीर्तनकार कु. सायली गर्दे हिच्या हस्ते विधिवत पुजाअर्चना झाली. गोवा विद्यापीठाच्या विद्यार्थी वाद्यवृंद घुमटआरती संघाने भक्तीभावाने उत्साहात घुमटआरती सादर केली. दिव्या बर्वे हिने प्रस्तुत केलेल्या सुश्राव्य सरस्वती वंदनेने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. शारदोत्सवाच्या प्रसंगी विद्या आणि भक्तीचा सुमेळ साधत अध्यापनासाठी आवश्यक असलेली नेट सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या रमा बर्वे, गौरी नाडकर्णी, प्राची नाईक, स्नेहा देसाई मराठी अध्ययनशाखेच्या माजी विद्यार्थ्यांना परितोषिक प्रदान करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमकार गोवेकर याने केले.

वार्षिक शारदोत्सवाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या फुलांची वेणी या स्पर्धेसाठी कविता गावडे तर मराठी पुस्तक मुखपृष्ठ चित्रण स्पर्धेत दिप्लवी नाईक हिला प्रथम, वेदांत खांडेपारकर यास द्वितीय तर गजानन गावस याला तृतीय, पारितोषिक देण्यात आली. याप्रसंगी शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळेच्या उप अधिष्ठाता प्रो. अनुराधा वागळे, मराठी अध्ययन शाखेच्या प्राध्यापक डॉ. सुनीता उम्रस्कर, प्रा. पूर्वा वस्त, प्रा. चिन्मय घैसास, डॉ. हेमंत अय्या, प्रा. जयेश गांवकर उपस्थित होते. गोवा विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवी शारदेचा आशीर्वाद घेतला. फुगडीसारख्या लोककलाप्रकारांचे सादरीकरण या ठिकाणी झाले. दिंडीच्या गजरात शारदोत्सवाची सांगता झाली.

